अकराव्या वित्त आयोगाने उपलब्ध करून दिलेला निधी-
ग्रंथालयांचा दर्जा उंचावणे-

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं १००३/३२५०/(२३६)-भाग-२/साशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२६
दिनांक २६ मार्च, २००४.

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक मराग्रं १००३/३२५०/(२३६)/साशि-५, दिनांक १२ मार्च, २००४.
२) दिनांक २३ मार्च, २००४ चे सम क्रमांकाचे शासन पत्र
३) वित्त विभागाचे दिनांक २२ मार्च, २००४ चे परिपत्रक क्र. पूरक १०.०४/ प्र.क्र.१०/२००४/अर्थसंकल्प-३.

शासन निर्णय :- अकराव्या वित्त आयोगाने ग्रंथालयांच्या खालील योजनांसाठी रू. ८.०० कोटी निधी मंजूर केला आहे :-

| | |
|---|---|
| १) राज्य मध्यवर्ती ग्रंथलयाचे संगणीकरण व पुस्तक खरेदी | रू. १.०० कोटी |
| २) राज्यातील शासकीय जिल्हा ग्रंथालयांकरिता प्रत्येकी रू.२०.०० लाख याप्रमाणे ग्रंथ खरेदी तसेच फर्निचर खरेदी आणि संगणकीकरणाद्वारे ग्रंथालयांचे उन्नतीकरण | रू. ७.०० कोटी |
| एकूण | रू. ८.०० कोटी |

वरील रू.८.०० कोटीपैकी केंद्र शसनाकडून रू.७२१.१४ लक्ष निधी प्राप्त झाला आहे. त्यापैकी रू.४,००,०००/- चा निधी यापूर्वी अर्थसंकल्पित झाला असून. सदर निधीचा कॉर्पस फड तयार करण्यासंबंधीचे आदेश दिनांक १२ मार्च, २००४ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. उर्वरित रू. ३,२१,१४,०००/- (रूपये तीन कोटी एकवीस लाख चौदा हजार फक्त) मार्च, २००४ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित झाले आहेत. सदर निधीचा कॉर्पस फंड तयार करून त्यावरील व्याजाच्या रकमेतून राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे संगणकीकरण व पुस्तक खरेदी व राज्यातील शासकीय जिल्हा ग्रंथालयांकरिता ग्रंथ खरेदी, फर्निचर खरेदी आणि संगणकीकरणाद्वारे ग्रंथालयांचे उन्नतीकरण या योजनेवर खर्च करण्यास खालील अटींच्या अधीन मान्यता देण्यात येत आहे :-

१) कॉर्पस फंड तयार करण्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.
२) उपरोक्त प्रयोजनासाठी वरील फंडाच्या व्याजातुन कोणताही खर्च करतांना शासनाची पूर्वमान्यता घेण्यात यावी .
३) या खर्चाची स्वतंत्र नोंदवही (Cash Book) ठेवण्यात यावी.
४) खर्चाचा त्रैमासिक अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

५) ज्या कारणासाठी केंद्र शासनाने निधी मंजूर केला आहे त्याच कारणासाठी तो खर्च येणा जावा.

६) संगणक खरेदी व पुस्तक खरेदीवर खर्च करण्यापूर्वी संगणक व तत्सम सामुग्री व पुस्तक खरेदीचा तपशील शासनास सादर करावा. सदर खरेदी विहित पध्दतीनेच करण्यात यावी.

७) मंजूर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र परिशिष्ट तीन मध्ये सादर करावे.

८) दिनांक २३ मार्च, २००४च्या शासन पत्रान्वये दिलेल्या सुचनेनुसार उपरोक्त निधीची गुंतवणूक करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

२. उपरोक्त बाबीवरील खर्च हा खालील प्रधान शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा :-

"२२०५- कला व संस्कृती-१०५- सार्वजनिक ग्रंथालये-

(०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य

पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-

(०३)(०५) प्रशासनाचा दर्जा उंचावणे- सार्वजनिक ग्रंथालये

(११ व्या वित्त आयोगाकडून मिळणारी अनुदाने)

( २२०५-११७-८ ) योजनांतर्गत / दत्तमत"

३. सदर आदेश वित्त विभागाचे दिनांक २२ मार्च, २००४ चे परिपत्रक क्रमांक पूरक १०.०४/ प्र.क्र.१०/२००४/अर्थसंकल्प-३. आणि वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६१४/अर्थोपाय, दिनांक २५.३.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

स्मिता गोरे

( स्मि.रा. गोरे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

ग्रंथपाल, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई,

ग्रंथपाल, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालये,

महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई,

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

वित्त विभाग (अथसं/व्यय-५)

नियोजन विभाग,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-१)

निवड नस्ती (साशि-५)